**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.८०५/२०२३**

**अमृत जगताप वि. राहुल शिंदे**

**नि.३६/क**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. २</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – अजित जयवंत खटावकर

वय – ५९ वर्षे

धंदा – वकील व नोटरी व्यवसाय

राहणार – ११८५/३१ क अनुपमा अपार्टमेंट फलाट नं. २ राजारामपुरी ५वी गल्ली, कोल्हापूर.

**<u>सरतपास फिर्यादी मार्फत वकील श्री. व्ही. ए. पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु,</u>**

१. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी साक्ष देण्याकरिता मला न्यायालयाकडून संमन्स प्राप्त झाले आहे. मी दि. ०७.०४.२०१५ पासून नोटरी म्हणून काम करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी हे माझेकडे कागदपत्र नोटरी करणेकरिता दि. २५.०१.२०२३ रोजी माझ्या कार्यालयात आले होते. फिर्यादी यांचे सोबत लिहून घेणार म्हणून आनंदराव पांडुरंग कांबळे हे देखील त्यावेळी उपस्थित होते. या कामी लिहून देणार व लिहून घेणार हे माझेसमक्ष त्यांचेकडील करारपत्र घेऊन आलेले होते व त्यांनी माझे समोर सदर करारपत्रातील मजकूर हा त्यांना समजलेला असून तो त्यांना मान्य असल्यामुळे त्यांनी माझे समक्ष सही व अंगठे केलेले आहेत. त्यानंतर मी लिहून घेणार व लिहून देणार यांची नोटरी रजिस्टर पान नं. १३ व १४ येथे नोंद केली व त्यावर लिहून घेणार व लिहून देणार यांच्या सहया व अंगठे घेतले. त्यावेळी साक्षीदार म्हणून दोघांनी माझे समक्ष सहया व अंगठे केलेले आहेत. मला सदर नोटरी केलेले कागदपत्र दाखविल्या मी ते ओळखू शकतो. आता मला

दाखविण्यात आलेला नि. २१ कडील करारपत्र तेच आहे. त्यास नोटरी क्र. ३० असा नोंदविण्यात आलेला होता. सदर करारपत्रावर लिहून घेणार व लिहून देणार यांचे फोटोसमक्ष त्यांच्या सहया व अंगठे घेण्यात आलेले आहेत. तसेच साक्षीदार यांच्या सहया व अंगठे हे देखील घेण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर सहया व अंगठे ही प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर मी सदर करारपत्रावर माझे नोटरी सील तीकीट लावून त्यावर माझी स्वाक्षरी केलेली होती. तसेच त्यावर मी प्रत्येक पानावर कोणतीही दुरुस्ती अथवा मजकूर बदल नसल्याबाबत प्रमाणपत्र स्टॅम्प करून त्याखाली माझी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक पानावर नोटरी क्रमांक व माझी सही नमूद आहे. तसेच करारपत्राचे पान जेथे जोडणी झालेले आहे त्या ठिकाणी माझा गोल शिक्का मारलेला आहे. तसेच प्रत्येक पान जोडणीवर लिहून घेणार व लिहून देणार यांची स्वाक्षरी देखील नमूद आहे. सदर नोटरी करतेवेळी मी लिहून घेणार व लिहून देणार यांचे आधारकार्ड स्व सांक्षाकित प्रत तसेच निवडणूक ओळखपत्र स्व सांक्षाकित प्रत घेतलेली होती व ती या करारपत्रासोबत जोडलेली आहे. या करारपत्रासोबत साक्षीदार क्र. १ यांचे आधार कार्ड स्व साक्षांकित प्रत त्यांचेकडून घेऊन मी जोडलेली होती. सदर कागदपत्रातील मजकूर हा लिहून घेणार व लिहून देणार यांची साक्षीदारांचे समक्ष तो खरा व बरोबर आहे असे सांगितलेला असल्यामुळे तो योग्य आहे.

२. आजरोजी न्यायालयात साक्ष देण्याकरिता मी माझे मूळ नोटरी रजिस्टर न्यायालयात आणलेले आहे. तसेच साक्षीदार व लिहून देणार व लिहून घेणार यांनी आणलेले करारपत्र मी नोटरी क्र. ३० यावर त्याची नोंद मी माझे कडील नोटरी रजिस्टर यास घेतलेली होती. सदर मूळ नोटरी रजिस्टर साक्षांकित करून त्याची प्रत मी आजरोजी न्यायालयात हजर केलेली आहे. मी हजर केलेल्या नोटरी रजिस्टर प्रत मधील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. ३७** देण्यात येत आहे. तसेच आजरोजी मी विधी व न्यायविभाग यांचे कडून मला प्राप्त झालेले नोटरी व्यवसाय प्रमाणपत्र याची साक्षांकित प्रत जोडलेली आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर सचिव न्याय विभाग यांची स्वाक्षरी आहे. त्यास **नि. ३८** देण्यात येत

आहे. तसेच मी आजरोजी आरोपी यांना नोटरीबाबत दिलेली पावती याची साक्षांकित प्रत हजर केलेली आहे. त्यावर तारीख व नोटरी क्र. ३० नमूद आहे. त्यावर आरोपी याचे नाव नमूद आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३९** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील श्री. एम. एस. शेटके यांचेमार्फत सुरु,**

३.माझे कार्यालय राजारामपुरी येथे आहे तसेच शाहुवाडी येथे देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी माझे समक्ष लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये पैसे देवाण घेवाण व्यवहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, लिहून घेणार यांनीच फक्त दस्त नोटरी करण्याकरिता आणलेला होता. नेहमी जेथे नोटरीची नोंद केली जाते तेथे प्रत्येकवेळी नोटरी पब्लीकसाो व ठिकाण अशी नोंद घेतली जातेच असे नाही. तसेच ज्या ठिकाणी कागदपत्रातील मजकूर समाप्त होतो त्या ठिकाणी आजरोजी मुक्काम अशी नोंद घेतली जातेच असे नाही. सदरचे करारपत्र हे माझ्या शाहुवाडी कार्यालयात नोटरी करण्यात आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर करारपत्रावर Presented and drafted by असे शब्द नमूद नाहीत. सदर करारपत्रासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांची मी पडताळणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझेसमक्ष कोणतेही करारपत्र नोटरी झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, या कामी लिहून घेणार व लिहून देणार यांनी सहया केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी हजर केलेल्या पावतीवर आरोपी याने सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-
**के. दि. काकतकर**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा.

दि. ०६.०८.२०२५